[This question paper contains 4 printed pages.]

**Your Roll No...............**

**Sr. No. of Question Paper : 4353** **L**

Unique Paper Code : 2081001011

Name of the Paper : Translation and Interpretation in Marathi

Name of the Course : **AEC**

Semester : II

Duration : 2 Hours Maximum Marks : 60

**Instructions for Candidates**

1. Write your Roll No. on the top immediately on receipt of this question paper.
2. Attempt **all** Questions.

**Que I. Choose the correct option for any five of the following questions.** 1 X 5 = 5

(खालील पैकी कोणत्याही पाच प्रश्नांचा योग्य पर्याय निवडून लिहा.)

1. ज्या भाषेतून अनुवाद करायचा आहे, त्या भाषेला काय म्हणतात?

   a) परकीय भाषा b) प्रादेशिक भाषा

   c) लक्ष्य भाषा (Target Language) d) मूळ किंवा स्रोत भाषा (Source Language)

2. स्रोत भाषेतील मजकूर लक्ष्य भाषेत अनुवादित करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात?

   a) स्रोतांतर b) भाषांतर

   c) स्थित्यंतर d) सारांशलेखन

3. अनुवाद हा .......... असता कामा नये.

   a) पक्षपाती b) वस्तुनिष्ठ

   c) अचूक d) निष्पक्षपाती

4. उत्तम अनुवादकासाठी खालीलपैकी कोणती गोष्ट सर्वात महत्त्वाची आहे?

   a) स्रोत आणि लक्ष्य या दोन्ही भाषांवर प्रभुत्व असणे b) खूप वेगाने टायपिंग करणे

   c) फक्त संगणक वापरता येणे d) केवळ एकाच भाषेचे ज्ञान असणे

*P.T.O.*

5. भाषांतर करताना 'सांस्कृतिक समतुल्यता' (cultural equivalence) म्हणजे काय?
   a) मूळ शब्द जशास तसे ठेवणे
   b) संबंधित संस्कृतीतील समतुल्य शब्द किंवा संकल्पना वापरणे
   c) भाषेचे सोपे रूप देणे
   d) भाषांतर करणे टाळणे

6. मराठीतील 'वाक्प्रचारांचा' अनुवाद करताना कोणती काळजी घ्यावी?
   a) केवळ इंग्रजीत लिहावे b) शब्दाला शब्द अनुवाद करावा
   c) दुसऱ्या भाषेत त्या अर्थाचा समान वाक्प्रचार शोधावा d) वाक्प्रचार सोडून द्यावेत

7. संगणकातील कोणते टूल भाषांतरासाठी वापरले जात नाही?
   a) गुगल ट्रान्सलेटर b) मायक्रोस्वाफ्ट ट्रान्सलेटर
   c) चाट जीपीटी d) पावरपॉईंट

8. संगणकाच्या मदतीने केल्या जाणाऱ्या भाषांतराचे वैशिष्ट्य काय?
   a) मानवी सहभागाशिवाय केलेले असते.
   b) अचूक आणि तंतोतंत असते.
   c) त्यामध्ये मानवी भावभावनांची दखल घेतलेली असते.
   d) सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय गोष्टींचा विचार केलेला असतो.

9. एका लिपीतील शब्द दुसऱ्या लिपीत जसेच्या तसे लिहिण्याला काय म्हणतात? (उदा. 'मराठी' चे 'Marathi' करणे)
   a) सारांश b) अनुवाद
   c) टीका d) लिप्यंतर (Transliteration)

**Que II. Write an answer any three of the following questions in short.** 5 X 3 = 15
(खालील पैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे लिहा.)

1. टीप लिहा - अनुवादकाची नैतिकता.
2. टीप लिहा : 'तांत्रिक अनुवाद'
3. ललितेतर साहित्याचे भाषांतर करताना कोणती काळजी घ्यावी लागते.
4. अनुवादाची गरज स्पष्ट करा.
5. वाचक आणि अनुवादक यांचे नाते कशा प्रकारचे असावे?
6. भाषांतर प्रक्रियेमध्ये अनुवादाच्या सर्व बऱ्या-वाईटास अनुवादक जबाबदार असतो, कसे ते सांगा?

**Que III. Write an answer *any one* of the following questions in detail.** 10 X 1 = 10

(खालील पैकी कोणत्याही एका प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.)

1. 'अनुवाद शास्त्र की कला' - चर्चा करा.
2. ललित साहित्यकृतीचे म्हणजेच कथा, कविता, नाटक, कादंबरीचे भाषांतर करताना कोणती काळजी घ्यावी?
3. उत्तम अनुवादकाची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**Que IV. Translate the following passages into English / Hindi.** 15 x 1 = 15

(खालील परिच्छेदाचा इंग्रजी किंवा हिंदी भाषेत भाषांतर करा.)

'वाचाल तर वाचाल' असे आपल्याकडे म्हटले जाते, आणि हे विधान आजही तितकेच सत्य आहे. वाचन ही केवळ एक सवय नसून ती एक साधना आहे. पुस्तके ही माणसाची सर्वात चांगली मित्र असतात. ती आपल्याला जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात न जाताही तिथल्या संस्कृतीची, इतिहासाची आणि विचारांची ओळख करून देतात. चांगल्या पुस्तकांमुळे मनुष्याचा दृष्टिकोन रुंदावतो आणि त्याच्या विचारांना प्रगल्भता येते. जो व्यक्ती नियमित वाचन करतो, त्याच्याकडे शब्दांचा अफाट साठा असतो आणि त्याची निर्णयक्षमता देखील सुधारते.

आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात आपण मोबाईल आणि इंटरनेटमध्ये गुरफटलो आहोत. माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत असली, तरी पुस्तकांप्रमाणे ती आपल्या मनावर खोलवर संस्कार करत नाही. अशा वेळी ग्रंथालयांचे महत्त्व अधिकच वाढते. ग्रंथालय हे ज्ञानाचे मंदिर असते. तिथे असलेले शांत वातावरण आपल्याला एकाग्रतेने अभ्यास करण्यास प्रवृत्त करते. अनेक दुर्मिळ ग्रंथ आणि विविध विषयांवरील पुस्तके एकाच छताखाली केवळ ग्रंथालयातच पाहायला मिळतात.

आपल्या नवीन पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे ही काळाची गरज आहे. केवळ परीक्षेसाठी न वाचता, आनंदासाठी आणि ज्ञानासाठी वाचण्याची वृत्ती जोपासली पाहिजे. प्रत्येक गावात आणि शाळेत समृद्ध ग्रंथालय असायला हवे. जर आपण रोज किमान अर्धा तास वाचला, तर आपले जीवन नक्कीच अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण होईल. लक्षात ठेवा, ज्या समाजाला वाचनाची आवड असते, तो समाज कधीही वैचारिकदृष्ट्या मागे राहत नाही.

**Que V. Translate *any one* of the following passages into Marathi.** 1 x 15 = 15

(खालील कोणत्याही एका परिच्छेदाचे मराठीमध्ये भाषांतर करा.)

(a) Time is the most precious resource available to mankind. Unlike money or material possessions, time once lost can never be recovered. Every second that passes is gone forever. Successful people in the world are those who understand the value of every

moment and use it wisely. Time management is not just about doing more work, but about doing the right work at the right time.

Procrastination, which means delaying tasks for tomorrow, is the greatest enemy of success. Many students and professionals fail to achieve their goals because they do not respect time. Life is short, and we have many responsibilities to fulfil. If we waste time in idle gossip or unproductive activities, we miss the opportunities that life offers us. A punctual person is always respected in society.

Nature also teaches us the importance of time. The sun rises and sets on time, and the seasons change according to their schedule. We must learn to discipline ourselves and create a balance between work and rest. Remember, time waits for no one. Those who master time master their lives. Therefore, start valuing your time today to build a better and brighter future.

**OR / अथवा**

(b) समय मानव जाति के लिए उपलब्ध सबसे अनमोल संसाधन है। धन या भौतिक संपत्ति के विपरीत, एक बार खोया हुआ समय कभी वापस नहीं पाया जा सकता है। बीतने वाला हर सेकंड हमेशा के लिए चला जाता है। दुनिया में सफल लोग वे हैं जो हर पल की कीमत समझते हैं और उसका बुद्धिमानी से उपयोग करते हैं। समय प्रबंधन (Time Management) केवल अधिक काम करने के बारे में नहीं है, बल्कि सही समय पर सही काम करने के बारे में है।

टालमटोल करना, जिसका अर्थ है कार्यों को कल के लिए टालना, सफलता का सबसे बड़ा दुश्मन है। कई छात्र और पेशेवर अपने लक्ष्यों को प्राप्त करने में विफल रहते हैं क्योंकि वे समय का सम्मान नहीं करते हैं। जीवन छोटा है, और हमें कई जिम्मेदारियों को पूरा करना है। यदि हम व्यर्थ की गपशप या अनुत्पादक गतिविधियों में समय बर्बाद करते हैं, तो हम उन अवसरों को खो देते हैं जो जीवन हमें प्रदान करता है। जो व्यक्ति समय का पाबंद होता है, समाज में उसका हमेशा सम्मान होता है।

प्रकृति भी हमें समय का महत्व सिखाती है। सूर्य समय पर उगता और अस्त होता है, और ऋतुएँ अपने समय के अनुसार बदलती हैं। हमें खुद को अनुशासित करना और काम और आराम के बीच संतुलन बनाना सीखना चाहिए। याद रखें, समय किसी का इंतजार नहीं करता। जो समय पर विजय प्राप्त करते हैं, वे अपने जीवन पर विजय प्राप्त करते हैं। इसलिए, बेहतर और उज्ज्वल भविष्य के निर्माण के लिए आज से ही अपने समय की कद्र करना शुरू करें।